# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः19.08.2025** **वारःमंगळवार**

---

1. समृद्धीला चालना देण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ग्वाही
2. बहुध्रुवीय जागतिक व्यवस्थेसाठी भारताची आग्रही भूमिका- परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांचं मत
3. संघर्ष संपवण्यासाठी रशिया आणि युक्रेनच्या राष्ट्राध्यक्षांमध्ये समोरासमोर चर्चा घडवणार - अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची घोषणा
4. आशियाई नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या गिरीश गुप्ताला सुवर्णपदक आणि
5. महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागात मुसळधार पावसाचा हवामान विभागाचा इशारा

**<u>पंतप्रधान-बैठक</u>**

समृद्धीला चालना देण्यासाठी विविध क्षेत्रांमध्ये जलद सुधारणा करण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे, असं मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावर व्यक्त केलं आहे. अत्याधुनिक सुधारणांच्या आराखडयाचा आढावा घेण्यासाठी काल झालेल्या उच्चस्तरीय बैठकीनंतर पंतप्रधानांनी ही प्रतिक्रिया व्यक्त केली, या बैठकीमध्ये सुलभ राहणीमान तसंच व्यवसाय सुलभतेमध्ये सुधारणा करण्यासाठी आणि समावेशक समृद्धीला चालना देण्यासाठीच्या उपाययोजनांना गती देण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आलं.

स्वातंत्र्यदिनाला पंतप्रधानांनी केलेल्या भाषणातील विविध घोषणाच्या अमलबजावणीसाठी या उच्चस्तरीय बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी अधिकाऱ्यांनी पंतप्रधानांना प्रशासन सुलभ करण्यासाठी, आर्थिक विकासाला बळकटी देण्यासाठी आणि नागरिकांना या उपाययोजनांचा थेट फायदा मिळावा यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. या उच्चस्तरीय बैठकीला गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान, अर्थमंत्री निर्मला सीतारमन आणि वाणिज्य मंत्री पियुष गोयल आदी उपस्थित होते.

**<u>अजित डोभाल</u>**

भारत दौऱ्यावर असलेले चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेणार आहेत. तसंच भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांच्यासमवेत सीमा प्रश्नावर विशेष प्रतिनिधींच्या चर्चेच्या 24 व्या फेरीत वांग यी सहभागी होणार आहेत. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांसोबतच्या बैठकीत सीमेवरील परिस्थिती, व्यापार आणि विमान सेवा पुन्हा सुरू करण्याच्या मुद्द्यांवर चर्चा होण्याची अपेक्षा आहे. पंतप्रधान मोदी या महिन्याच्या शेवटी

तियानजिन इथं होणाऱ्या शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी चीन दौऱ्यावर जाणार आहेत; त्यापूर्वी ही बैठक होत आहे.

**EAM-दहशतवाद**

सध्याच्या आंतरराष्ट्रीय वातावरणात जागतिक अर्थव्यवस्थेत स्थैर्य राखणं आणि ते आणखी वाढवणं आवश्यक झालं असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. भारत समन्यायी, संतुलित आणि बहुध्रुवीय जागतिक व्यवस्थेसाठी आग्रही असल्याचं स्पष्ट करत सुधारित बहुपक्षवाद ही काळाची गरज असल्याचं डॉ. जयशंकर यांनी नमूद केलं. सध्या भारत दौऱ्यावर असलेले चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांच्याशी डॉ. जयशंकर यांनी चर्चा केली, त्यावेळी सर्व प्रकारच्या दहशतवादाविरुद्धच्या लढ्याला भारताचं सर्वोच्च प्राधान्य असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं. यावेळी दोन्ही नेत्यांमध्ये आर्थिक आणि व्यापारी संबंध, तीर्थयात्रा, उभय देशांच्या नागरिकांमधले परस्पर संबंध, नदीच्या पाण्याबाबत माहितीचं आदानप्रदान यासह इतर अनेक व्यापक मुद्द्यांवर चर्चा झाली.

**संसद**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात विरोधकांनी कालही विविध मुद्द्यांवरून दोन्ही सभागृहांमध्ये जोरदार घोषणाबाजी केली. राज्यसभेचं कामकाज सुरू होताच सभागृहाचे माजी सदस्य आणि नागालँडचे राज्यपाल ला गणेशन यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर मतदार याद्या पुनरीक्षणावर चर्चेची मागणी करत विरोधी पक्षांच्या सदस्यांनी घोषणा द्यायला सुरुवात केली. या मुद्द्यावरून दोन्ही सदनात गदारोळ सुरूच राहिल्यानं दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी स्थगित करण्यात आलं. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणारे भारताचे पहिले अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव काल दोन्ही सभागृहात मंजूर करण्यात आला.

**पंतप्रधान-राज्यपाल भेट**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार म्हणून महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचं नाव घोषित झाल्यानंतर काल त्यांनी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सदीच्छा भेट घेतली. राधाकृष्णन हे अनुभव समृद्ध असून, विविध पदांवर काम करताना त्यांनी समाजाची सेवा आणि उपेक्षितांना सक्षम बनवण्यावर भर दिल्याचं मोदी यांनी समाजमाध्यमांवर लिहिलेल्या संदेशात म्हटलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपालांची सदिच्छा भेट घेऊन त्यांचं अभिनंदन केलं. येत्या 9 सप्टेंबरला उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक होणार आहे.

**फॅक्ट चेक**

ऑपरेश सिंदूर सुरू असताना बेपत्ता वायू दल प्रमुख एअर चीफ मार्शल ए पी सिंग यांनी भारतीय वैमानिक शिवांगी सिंग यांच्या घरी भेट दिल्याचा दावा करणारे काही चित्रफिती समाज माध्यमांवरून पसरवले जात आहेत. या चित्रफितीमधील दावे सरकारनं फेटाळले आहेत. पत्रसूचना कार्यालयाच्या तथ्य शोधन विभागानं हे दावे खोटे असल्याचं सांगत ते अपप्रचार करणाऱ्या पाकिस्तानधार्जिण्यांकडून सामायिक केले जात असल्याचं स्पष्ट केलं आहे. स्क्वाड्रन लीडर शिवांगी या भारतीय वायू दलाच्या कार्यरत सदस्य असून त्या अद्यापही कार्यरत म्हणून नियुक्त असल्याचंही पुढे सांगण्यात आलं आहे.

**ट्रम्प**

युक्रेनमधील संघर्ष संपवण्यासाठी रशिया आणि युक्रेनच्या राष्ट्राध्यक्षांमध्ये समोरासमोर चर्चा आयोजित करण्याचा आपला प्रयत्न असेल असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल समाजमाध्यमावर जाहीर केलं. ट्रम्प यांनी काल रात्री व्हाईट हाऊसमध्ये युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की आणि इतर युरोपीय नेत्यांचं स्वागत केल्यानंतर रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी चर्चा केली. दरम्यान पुतिन यांनी झेलेन्स्की यांना भेटण्याची तयारी दर्शवल्याचं ट्रम्प यांनी सांगितलं. या दोन्ही नेत्यांच्या एकत्रित बैठकीचं ठीकाण अजुन ठरायचं असून बैठकीची व्यवस्था मात्र सुरू करण्यात आली आहे.

**मोदी-पुतिन फोन**

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासोबत अलास्का येथे झालेल्या भेटीबद्दल माहिती सांगितल्याबद्दल रशियन राष्ट्राध्यक्षांचे आभार मानले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची काल रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा झाली होती. भारताने युक्रेन संघर्षाच्या शांततापूर्ण तोडग्याचे सातत्याने आवाहन केले आहे आणि या संदर्भात सर्व प्रयत्नांना पाठिंबा दिला आहे असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

**तिरंदाजी**

कॅनडातील विनिपेग इथं आजपासून सुरू होणाऱ्या जागतिक युवा अजिंक्यपद 2025 साठी 24 खेळाडूंचा भारतीय तिरंदाजी संघ सज्ज झाला आहे. ही स्पर्धा 24 ऑगस्टपर्यंत चालणार असून त्यात 63 देशांमधील 570 खेळाडू सहभागी होणार आहेत.

**नेमबाजी सुवर्ण**

कझाकस्तानमधल्या शिमकेंत इथं सुरू असलेल्या 16 व्या आशियाई नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या गिरीश गुप्ता यानं युवा पुरुष गटात 10 मीटर एअर पिस्टल प्रकारात सुवर्ण पदक पटकावलं. 17 वर्षाच्या गुप्तानं अंतिम फेरीत 241 पूर्णांक 3 गुण मिळवत बाजी मारली, तर त्याचा 14 वर्षीय भारतीय प्रतिस्पर्धी देव प्रताप यानं 238 पूर्णांक 6 गुणांसह रौप्य पदकाची कमाई केली. तत्पूर्वी कनिष्ठ पुरुष गटात एअर पिस्टल मध्ये कपिल बैंसला यानंही सुवर्ण पदकावर नाव कोरलं. भारताच्या वरिष्ठ आणि कनिष्ठ दोन्ही संघांनी रौप्य पदक मिळवलं. अशा प्रकारे काल दिवस अखेर भारताच्या खात्यात दोन सुवर्ण आणि तीन रौप्य पदकं जमा झाली. आज या स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी महिलांच्या एअर पिस्टलच्या अंतिम फेऱ्या होणार आहेत.

**जम्मू-काश्मीर-मदत कार्य**

जम्मू आणि काश्मीरमध्ये, किश्तवार जिल्ह्यातील चिसोटी गावात बचाव आणि मदत कार्य काल सलग पाचव्या दिवशीही सुरूच राहिलं, गेल्या आठवड्यात झालेल्या ढगफुटीमुळे पूरग्रस्त कुटुंबांना मदत करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न सुरू आहेत. मृतांची संख्या 62 वर पोहोचली असून 41 जण बेपत्ता आहेत. मृतांची संख्या आणखी वाढू शकते असा इशारा बचाव पथकांनी दिला आहे.

**पाऊस**

महाराष्ट्राच्या बहुतांश भागात काल जोरदार पाऊस पडला. विशेषतः मुंबई ठाणे कोकण आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना पावसानं अक्षरशः झोडपून काढलं. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झालं असून पावसामुळे झालेल्या विविध दुर्घटनांमध्ये सात जणांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. ठिकठिकाणच्या नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली असून अनेक धरणांमधून मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरू आहे; त्यामुळे नदी काठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. या पावसामुळे शेतीचंही मोठं नुकसान झालं आहे.

**मुख्यमंत्री पावसाचा आढावा**

अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सविस्तर बैठक घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला. राज्याच्या विविध भागांमधल्या परिस्थितीची तपशीलवार माहिती देऊन, रत्नागिरी, रायगड आणि हिंगोली जिल्ह्यांमध्ये जास्त पाऊस झाला असून तिथल्या नागरिकांनी पुढचे काही दिवस सतर्क राहावं, असं आवाहन त्यांनी केलं. यावेळी अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या भागांचे पंचनामे करण्याचे आदेश त्यांनी दिले. मराठवाड्यातल्या 800 गावांना अतिवृष्टीचा फटका बसला असून 1 लाख हेक्टर शेतीचं नुकसान झालं असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

**इशारा**

येत्या 24 तासात महाराष्ट्रात मुंबई, ठाणे, रायगड तसंच पुणे, सातारा, रत्नागिरी, आणि कोल्हापूरच्या घाट परिसरात अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला असून पालघर, सिंधुदुर्ग, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, अमरावती, चंद्रपूर आणि गडचिरोली या भागात मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. या काळात समुद्र खवळलेला असेल; त्यामुळे मच्छीमारांनी समुद्रात जाऊ नये, अशा सूचना दिल्या आहेत.

**हवामान**

दरम्यान भारतीय हवामान विभागानं आज महाराष्ट्रासह कर्नाटक, गुजरात, आणि गोव्यातही काही ठिकाणी अति मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. छत्तीसगड, केरळ, तेलंगणामध्येही मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.